तरुण भारत
Nagpur Main | 2024-04-17 | Page- 9
epaper.tarunbharat.net

# गडचिरोलीच्या संवेदनशील ६८ मतदान केंद्रांवर २९५ अधिकाऱ्यांचे एअरलिफ्ट

◆ मुंबई, १६ एप्रिल

गडचिरोलीतील विविध संवेदनशील आणि अतिसंवेदनशील मतदारसंघात निवडणूक प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्यासाठी २९५ मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांना ईव्हीएम आणि इतर युनिटसह मंगळवारी सकाळी भारतीय वायुसेना आणि लष्कराच्या हेलिकॉप्टरने मतदार केंद्रावर सुरक्षितपणे पोहोचविण्यात आले.



गडचिरोलीची ओळख नक्षलग्रस्त जिल्हा म्हणून आहे. नक्षलवाद्यांचा लोकशाही प्रक्रियेला विरोध आहे. नुकतेच दोन दिवस अगोदर लोकसभा निवडणुकीच्या पृष्ठभूमीवर नक्षलवाद्यांनी निवडणुकीवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन एका पत्रकाच्या माध्यमातून केले आहे. गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदार संघात एकूण सहा विधानसभा क्षेत्रांचा समावेश असून, अहेरी विधानसभा क्षेत्र अतिसंवेदनशील व नक्षलग्रस्त क्षेत्रम्हणून ओळखला जातो. या क्षेत्रात मुलचेरा, एटापल्ली, भामरागड, अहेरी आणि सिरोंचा या पाच तालुक्यांचा समावेश आहे.

या अतिदुर्गम भागात नक्षली बॅनर आणि पत्रकं टाकून दरवेळी लोकशाहीच्या उत्सवाला विरोध करतात आणि नागरिकांना विरोध करण्याचे आवाहन करीत असतात. अशा अतिदुर्गम भागातील मतदान केंद्रांवर मतदानाची प्रक्रिया कडक सुरक्षा व्यवस्थेत पार पाडली जाते. १९ एप्रिल रोजी होणाऱ्या मतदानाकरिता संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर मतदान पथके रवाना करण्यास आजपासूनच सुरूवात करण्यात आली.

अशा विविध संवेदनशील आणि अतिसंवेदनशील अशा ६८ मतदान केंद्रांवरील ७२ निवडणूक पथकाच्या २९५ मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांना ईव्हीएम आणि इतर युनिटसह आज सकाळी भारतीय वायुसेना आणि लष्कराच्या ३-एम.आय.- १७ आणि ४-ए.एल.एच. हेलिकॉप्टरच्या मदतीने बेसकॅम्पवर सुरक्षितपणे पोहचिविण्यात आले आहे.

◀ *(तभा वृत्तसेवा)*

Powered by iDocuments

लोकमत

# माओवादग्रस्त भागात हेलिकॉप्टरने ईव्हीएम रवाना

## पोलिस बंदोबस्त तैनात : ६८ केंद्रांवर २९५ मतदान अधिकाऱ्यांचे एअर-लिफ्ट



पोलिस मुख्यालयातून मंगळवारी बंदोबस्तात हेलिकॉप्टरने मतदान यंत्र व अधिकाऱ्यांना दुर्गम, अतिदुर्गम भागात पोहोच करण्यात आली.

लोकमत न्यूज नेटवर्क

**गडचिरोली :** पहिल्या टप्प्यात १९ एप्रिलला होऊ घातलेल्या गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघातील माओवादग्रस्त भागातील संवेदनशील व अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर मतदान पथके रवाना करण्यास १६ एप्रिलला सुरुवात करण्यात आली. ६८ केंद्रांवर २९५ मतदान अधिकाऱ्यांना हेलिकॉप्टरने ईव्हीएम व इतर साहित्यासह पोहोच करण्यात आले.

राज्यातील सर्वात अतिसंवेदनशील मतदारसंघ असलेल्या गडचिरोली-चिमूरमध्ये निवडणुका सुरळीत पार पाडण्यासाठी कडेकोट बंदोबस्त तैनात केला जाणार आहे. छत्तीसगड व तेलंगणा सीमेवरील विविध संवेदनशील व अतिसंवेदनशील अशा ६८ मतदान केंद्रांवरील ७२ निवडणूक पथकाच्या २९५ मतदान अधिकारी व कर्मचाऱ्यांना ईव्हीएम आणि इतर युनिटसह १६ रोजी सकाळी भारतीय वायुसेना आणि भारतीय लष्कराच्या ३, एम.आय. १७ आणि ४ ए.एल.एच. हेलिकॉप्टरच्या मदतीने बेसकॅम्पवर सुरक्षितपणे पोहोचविण्यात आले.

या लोकसभा मतदारसंघात एकूण सहा विधानसभा क्षेत्रांचा समावेश असून अहेरी विधानसभा क्षेत्र अतिसंवेदनशील व नक्षलग्रस्त म्हणून ओळखले जाते. या क्षेत्रात मुलचेरा, एटापल्ली, भामरागड, अहेरी आणि सिरोंचा या पाच तालुक्यांचा समावेश आहे.

सुरक्षेच्या दृष्टीने संबंधित ठिकाणी पोलिस ठाणे व पोलिस मदत केंद्रांत योग्य त्या उपाययोजना केल्या आहेत. पोलिस अधीक्षक नीलोत्पल सर्व बारीकसारीक हालचालींवर लक्ष ठेवून आहेत.

पुण्य नगरी

# दिव्यांग मतदारांच्या मतदानासाठी प्रशासन सज्ज







**बुलढाणा**, दि. १५ (प्रतिनिधी)

**आगामी लोकसभा निवडणुकीसाठी ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांग मतदार मतदानाच्या कर्तव्यापासून वंचित राहणार नाही, यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. दिव्यांगांसाठी काम करणाऱ्या सर्व स्वयंसेवी संस्था आणि कार्यकर्त्यांनी दिव्यांग जनजागृतीसाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन जिल्हा परिषदेचे समाज कल्याण अधिकारी मनोज मेरत यांनी केले.**

स्थानिक अपंग कल्याण व पुनर्वसन संस्थेच्या वतीने आज दिव्यांग मतदार जाणीव जागृती करण्यात आली. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष अजय कारंजकर, सचिव जयसिंग जयवार, दिव्यांग कल्याण विभागाचे सहाय्यक सल्लागार शालिग्राम पुंड आदी उपस्थित होते.

## जागृतीसाठी विशेष भर

६ एप्रिल रोजी जिल्ह्यातील १ हजार ९६२ मतदान केंद्रांवर बुलढाणा लोकसभा निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. दिव्यांग मतदारांसाठी सक्षम ॲप विकसित करण्यात आले आहे. यामध्ये नोंदणी करून दिव्यांग मतदारांना मतदान केंद्रावर येण्याची सुविधा, व्हीलचेअर, तसेच आवश्यकता भासल्यास मागणीनुसार मदतनीस देण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने मतदारांनी विशेषतः नवमतदार, महिला, दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांनी लोकशाहीच्या या उत्सवात उत्साहाने सहभागी होऊन मतदानाचे कर्तव्य पार पाडावे, यासाठी जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक जाणीव जागृती करण्यात येत आहे.

मतदान प्रक्रियेतील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचण्यासाठी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा स्वीप नोडल अधिकारी बी.एम. मोहन यांच्या पुढाकाराने विविध घटकांना केंद्रस्थानी ठेऊन सुनियोजित मतदार शिक्षण व निवडणूक सहभाग कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या पार्श्वभूमीवर समाज कल्याण विभागाच्या वतीने दिव्यांग मतदारांसाठी स्वयंसेवी संस्था व कार्यकर्त्यांच्या माध्यमातून जाणीव जागृतीसाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

### मतदानाचा टक्का वाढविण्याचे प्रयत्न

त्याअनुषंगाने आज या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी जिल्ह्यातील सुमारे १८ हजार नवमतदार, सोळा हजार दिव्यांग मतदार, ३० हजार ज्येष्ठ मतदार यांच्यासह संपूर्ण मतदारांना लोकशाहीच्या उत्सवात उत्स्फूर्तपणे सहभागी करून घेण्यासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून प्रशासनाने प्रयत्न सुरू केले आहे.

### मुलभूत सुविधा उपलब्ध करणार

दरम्यान जिल्ह्यातील सर्व दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना मतदान केंद्रावर आवश्यक असलेल्या मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याची तयारी प्रशासनाने केली आहे. मतदानाच्या कर्तव्यापासून कुणीही वंचित राहणार नाही, यासाठी सर्वांनी संघटित प्रयत्न करावेत, असे आवाहन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तथा जिल्हा स्वीप नोडल अधिकारी बी.एम. मोहन यांनी केले आहे.